# विपश्यना

साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

बुद्धवर्ष २५५६, कार्तिक पौर्णिमा, २८ नोव्हेंबर २०१२, वर्ष १ अंक ९

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx


**धम्मवाणी**

**नगरं यथा पच्चन्तं, गुत्तं सन्तरबाहिरं।**
**एवं गोपेथ अत्तानं, खणो वो मा उपच्चगा।**
**खणातीता हि सोचन्ति, निरयम्हि समप्पिता॥**

*धम्मपद- ३१५, निरयवग्गो*

जसे (एखादे) सीमावर्ती नगर आतून-बाहेरून (खूप) रक्षित असते, तसेच स्वतःला रक्षित ठेवावे. क्षणभराचीही चूक करू नये, कारण क्षणभरासाठीही चुकलेले लोक नरकात पडून शोक करतात.

## सत्कर्मांनी सद्गती

एका गावाच्या प्रमुखाने भगवान बुद्धांना विचारले की लोक सुगती प्राप्त करण्यासाठी खूपसे कर्मकांड करतात, अनेक प्रकारच्या वेषभूषा, माला-गंध-विलेपन धारण करतात, अनेक प्रकाराने अग्नि-परिचर्या व अन्य कर्मकांड करून समजतात की आम्ही सर्व काही केले. काही असेही आहेत जे खालच्या दर्जाची तांत्रिक साधना करून एखाद्या प्रेत-प्राण्याशी बोलतात आणि त्याच्याद्वारे लोकांना स्वर्गात घेऊन जाण्याचा दावा करतात. भगवान आपण तर सर्वज्ञ आहात. आपणही काही असे करावे ज्यामुळे जगातले सारे प्राणी मरणोपरांत सुगतिमय स्वर्गलोकातच जाऊ शकतील.

भगवानांनी त्यालाच प्रश्न विचारून समजविण्याचा प्रयत्न केला. तुम्ही काय समजता की कोणी जीव-हिंसक असेल, चोरी करणारा असेल, व्यभिचारी असेल, खोटे बोलणारा असेल, चुगली करणारा असेल, कठोर बोलणारा असेल, गप्पिष्ट असेल, लोभी असेल, नीचवृत्तीचा असेल, मिथ्यादृष्टियुक्त असेल, तर काय तो स्वर्गात जाण्यालायक आहे? अथवा त्याच्या मृत्युनंतर पुष्कळशा लोकांनी तेथे एकत्र होऊन प्रार्थना केली, हात जोडून वंदना केली की आपण सुगतिगामी व्हावे, स्वर्गलोकात उत्पन्न व्हावे, तर असे करण्यामुळे तो स्वर्गलोकात उत्पन्न होऊ शकतो काय? नाही, मरणोपरांत केले जाणारे कोणतेही कर्मकांड कोणालाही मुक्ती देऊ शकत नाही, हे असंभव आहे.

एका उदाहरणाने समजा. एखाद्या मोठ्या जलाशयात एखादी मोठी दगडाची शिला सोडली आणि ती आपल्या भाराने पाण्यात बुडाली तर काय समजता की एखाद्या विशाल जनसमूहाच्या प्रार्थनेमुळे, नवसामुळे आणि पूजा-पाठामुळे अथवा एखाद्या अन्य कर्मकांडामुळे ती भारी शिला पाण्यावर तरंगेल काय?

असेच कोणी व्यक्ती तूप-तेलाने भरलेल्या माठांना पाण्यात नेऊन फोडेल आणि त्यातील तूप, तेल पाण्यावर तरंगायला लागेल तसेच एखाद्या दुसऱ्या माठात दगड-गोटे भरून त्यालाही फोडेल व ते आपल्या भाराने पाण्यात बुडतील, तेव्हा कोणी प्रार्थना करून, पूजा-पाठ करून, कर्मकांड करून म्हणेल की हे तूपा तू खाली जा, खाली जा! हे दगड-गोट्यांनो तुम्ही वर या, वर या! जर असे होत असेल तर करून पाहा.

हे ग्रामणी! ह्याचप्रकारे कोणी जर प्राणीहिंसेपासून, चोरीपासून, व्यभिचारापासून, खोटे बोलण्यापासून इत्यादी दुष्कर्मांपासून दूर राहात असेल आणि सत्यधर्माचे जीवन जगत असेल, तर तो मरणोपरांत वरच जाईल. त्याची ऊर्ध्वगतीच होईल. कोणाचाही शाप त्याला नरकाच्या कष्टमय जीवनात पाठवू शकत नाही. त्याचे सत्कर्मच त्याला वर घेऊन जाईल. त्याला वर जाण्यापासून कोणीही अडवू शकत नाही. हा निसर्गाचा अतूट नियम आहे.

---

अशाच एका अन्य प्रसंगात भगवानांना विचारण्यात आले की भगवान आपण सर्वांवर समान रूपाने करुणाभाव ठेवता काय, दयाभाव ठेवता काय? जर होय, तर कोणाला खूप लाभ होतो, कोणाला मध्यम लाभ होतो आणि कोणी-कोणीतर धर्मलाभापासून वंचितच राहतात, असे का? आपल्या मंगलमय करुणेचा प्रभाव सर्वांवर एकसारखाच का होत नाही?

भगवानांनी त्याला एका शेतकऱ्याचे उदाहरण देऊन समजाविले की त्याच्याजवळ तीन प्रकारच्या जमिनी आहेत– १. खूप सुपीक २. मध्यम सुपीक ३. एकदम नापीक, ओसाड. अशा परिस्थितीत तो सर्व प्रथम सुपीक जमिनीत बीज टाकतो, त्यानंतर मध्यम जमिनीत व सर्वात शेवटी नापीक-ओसाड जमिनीत. बीज तेच असते आणि तेवढ्याच मेहनतीने व तळमळीने टाकले जाते. परंतु पीक एकसारखे येत नाही. ह्याचप्रकारे माझ्याजवळही तीन प्रकारचे लोक धर्म शिकण्यासाठी येतात. एक तर खूप गंभीर साधक-साधिका, जे सुपीक जमिनीसारखे आहेत. त्यात जे बीज पडेल, ताबडतोब फलदायक होईल. कारण ते पूर्ण श्रद्धा आणि तळमळीने कामाला लागतात. दुसरे सामान्य गृहस्थ उपासक उपासिका, जे आपल्या दैनिक सांसारिक कामात पडलेले असूनसुद्धा धर्म शिकतात. ते मध्यम शेतासमान आहेत. त्यांच्यात श्रद्धा व तळमळ तर आहे परंतु संसाराच्या अनेक अडचणीही आहेत. तरीही ते धर्ममार्गावर चालून आपले मंगल साधतातच. तिसरे काही असे लोक जे नापीक-ओसाड जमिनीसमान आहेत. उपदेश तर त्यांनाही मी तसाच देतो परंतु आपल्या कर्मकांडांमध्ये आणि अन्य जंजाळात गुंतले असल्यामुळे ते धर्माला योग्य प्रकारे ग्रहण करू शकत नाहीत. ते जेवढे शिकून, समजून जितका अभ्यास करतात, त्यांना केवळ तेवढाच लाभ होतो. कोणी-कोणी केवळ ऐकून चालला जातो, थोडासाही अभ्यास करीत नाही, तर तो धर्मापासून सर्वस्वी वंचित राहतो. परंतु माझी करुणा त्या सर्वांप्रती नेहमी तेवढीच राहते.

भगवानांनी अजून एक उदाहरण देऊन समजाविले की एखाद्याजवळ तीन माठ आहेत. एक बिलकूल छिद्ररहित, दुसरा सूक्ष्म छिद्रे असणारा आणि तिसरा मोठे छिद्र असणारा. तो सर्वप्रथम विना छिद्र असणाऱ्या माठात पाणी भरतो, जे दिवसभर त्याच्या कामी येते. नंतर दुसऱ्या माठात पाणी भरतो की जरी ते दिवसभर चालले नाही तरी

काही वेळापर्यंत त्यातून पाणी मिळतेच. तिसऱ्या माठात तो पाणी ह्यासाठी भरतो की जितकेही पाणी एकत्र होईल तेवढे स्नानासाठी अथवा कपडे-भांडे धुण्यासाठी तरी कामात येईल.

खूप गंभीर साधक-साधिका पहिल्या माठासमान आहेत. दुसऱ्या माठासमान ते सामान्य उपासक-उपासिका आहेत जे अडचणी असतांनाही धर्माला धारण करतात. वेगवेगळ्या कर्मकांडात गुंतलेले लोक तसेच आहेत जसे तिसऱ्या माठात भरलेले पाणी. ते जितके ग्रहण करतील, अभ्यास करतील, त्यांना केवळ तेवढाच लाभ होईल. मात्र माझी दया आणि करुणा सर्वांप्रती समानच राहते.

भगवानांद्वारे उपदेशित ह्या उदाहरणांपासून धडा घेऊन साधकांनो! या, आम्हीही धर्ममार्गावर सुपीक क्षेत्र बनून, श्रद्धा आणि तळमळीने पाचही शीलांचे पूर्णपणे पालन करीत. सम्यक समाधीला पुष्ट करू आणि अनित्यबोधिनी प्रज्ञेचा सखोलतेने अभ्यास करीत आपल्या सदाचरणाच्या बळावर आपली सुगती निश्चित करू या. ह्यातच आमचे मंगल आहे, कल्याण आहे.

कल्याणमित्र
सत्यनारायण गोयन्का

---

# उद्‌बोधन

(धम्म-विपुल विपश्यना केंद्र, वाशीच्या उद्‌घाटन-शिबिराच्या प्रसंगी दि. ४/३/२०१२ ला दिल्या गेलेल्या पूज्य गुरुदेवांच्या प्रवचनाचा संक्षिप्त अंश)

धर्माचे स्थान धर्माची साधना करण्यामुळेच मंगलमय होते. चांगला आश्रम बनला आहे. इतक्या साधक-साधिकांनी एकत्रित होऊन साधनेचे काम सुरू केले आहे. हे केंद्रही अन्य सर्व केंद्रांप्रमाणेच खूप पसरेल, खूप लोक कल्याण करेल. आवश्यक आहे की व्यक्ती-व्यक्तीत धर्म जागावा. व्यक्ती-व्यक्ती धर्मात पुष्ट होवो. ह्या केंद्रात लोक तप करण्यासाठी येतील. हे काही कर्मकांड नाही की आम्ही तपोभूमीवर जाऊन दहा दिवस घालविले, आता आम्ही बदलून जाऊ, मुक्त होऊ.

धर्माची आपली मर्यादा आहे. ह्या मर्यादेचे पालन करावयाचे आहे. मर्यादा हीच आहे की धर्म जीवनात उतरवावा. जो आपलेच मंगल करू शकत नाही, तो इतरांचे काय मंगल करेल? ह्यामुळे कोणावरही उपकार करण्यासाठी नाही, कोणावर कृपा करण्यासाठी नाही, प्रत्येकाला आपल्या भल्यासाठी, आपल्या कल्याणासाठी धर्मात खूप पक्व झाले पाहिजे. धर्मात पक्व होऊन जेव्हा आपले भले होऊ लागेल, तेव्हाच इतरांच्या भले होण्यात सहायक होऊ शकता. एखादा स्वतः तर तप करीत नाही. परंतु केवळ इच्छितो की सर्व जगाने विपश्यना करावी, असे होत नाही. प्रथम स्वतः पाहा की माझ्यात धर्म किती पसरत आहे. माझ्यात पसरत आहे तरच बाहेर पसरणे सोपे होईल.

असे होऊ नये की दहा-वीस-पन्नास अथवा शंभर वर्षानंतर लोक हे म्हणू लागतील की येथे काही तपस्या होत होती. येथे एक केंद्र होते. त्याचा अमुक-अमुक आचार्य होता-असा चुकीचा इतिहास बनू नये. धर्म खूप पसरावा आणि तेव्हाच पसरेल जेव्हा प्रत्येकात धर्म जागेल. हे धर्म जागविण्याचे स्थान आहे. आपल्या आत धर्मात पक्व होण्याचे स्थान आहे. आपल्या कल्याणासाठी, आपल्या भल्यासाठी आणि ह्या प्रकारे इतरांच्या कल्याणासाठी, इतरांच्या भल्यासाठी.

धर्माच्या मार्गावर चालणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या मनात किंचितही हा भाव येऊ नये की ह्यावर माझे प्रभुत्व असावे. हे केंद्र मी बनविले. हे केंद्र बनविण्यात मी किती मदत केली. हे केंद्र माझ्या हातात राहावे. तर बिचाऱ्याला धर्म समजला नाही. धर्माचे केंद्र आहे. महत्व धर्माचे असावे. जेथे याचा ऱ्हास होऊ लागला, तेथे धर्म बुडू लागला. स्थाना-स्थानावर, वेळोवेळी धर्माची जी मोठी कामे झालीत, इतिहास सांगतो की तेथे-तेथे जर पतन झाले तर का झाले? एक मनुष्य, दोन मनुष्य, दहा मनुष्य – हे माझ्या हातात यावे. मी मालक बनू. धर्माचे शत्रू आहेत असे लोक.

भाव असाच असावा की लोक जसे तप करीत आहेत, तसेच तप मी ही करू. मला पाहून इतर लोकही तप करोत. बस तप करण्याच्याच गोष्टी. प्राप्तीच्या गोष्टी नाहीत की ह्यामुळे मला काय मिळाले? कोणी सेवा करतो, कोणी दान देतो, कोणी धर्म शिकवितो आणि बदल्यात काही इच्छितो तर तो धर्माच्या क्षेत्रात कुचकामाचा मनुष्य आहे. प्रसन्नता ह्याच बाबीत असावी की लोक कल्याण होत आहे की नाही! बस एकच बाब की लोक कल्याण होत आहे. आम्ही तर सेवक आहोत, सेवा देणारे आहोत.

मी जाणतो साऱ्या विश्वात इतक्या मोठ्या संख्येने साधक आहेत. किती निष्ठेने काम करतात. किती निष्ठेने धर्म पसरवितात. कसे पसरवित आहेत – आपल्या जीवनात उतरवून. लोक पाहतात, अरे ही व्यक्ती कशी होती? विपश्यना साधना करण्यामुळे कशी बदलली. बदलल्यामुळे त्याला पाहून लोक विपश्यनेकडे आकर्षित होत आहेत. धर्माकडे आकर्षित होत आहेत. कोणताही संप्रदाय बांधण्यासाठी नाही, कोणताही राजकीय पक्ष तयार करण्यासाठी नाही, आपले प्रभुत्व स्थापन करण्यासाठी नाही. जे लोक येतात त्यांचे कल्याण होते, हेच पाहून मन प्रसन्न होते. ह्या व्यतिरिक्त काही अजून बाब असेल तर त्या मनुष्यात धर्माचे नावनिशान नाही. एकच लक्ष्य आहे की तप करावयाचे आहे, आम्हाला तप करावयाचे आहे.

प्रत्येक व्यक्तीच्या मनात काही ना काही दोष असतोच. दोष नसेल तर अरहंत झाले, बुद्ध झाले. स्वतः तपासून पाहा की माझ्यातही दोष आहे. मला हा दोष काढावयाचा आहे. दोष काढण्यासाठी ही विद्या मिळाली आहे. जेथे स्वार्थाची भावना आहे, अहंकाराची भावना आहे, मी, मी, मीची भावना आहे, तर धोकादायक आहे. धर्मापासून दूर आहे. प्रत्येक व्यक्तीने विचार करावा, समजावे आणि नंतर असे आदर्श जीवन जगावे ज्याला पाहून इतरांनाही प्रेरणा मिळावी. प्रत्येक जण आकर्षित व्हावा की ह्याच्यामुळे अनेक लोकांना लाभ झाला! त्यामुळेच धर्म पसरत आहे. ह्या प्रसारात मी बाधक न बनू. आपल्यात जो अहं आहे, त्याला काढावयाचे आहे. त्याला काढावयाचे लक्ष्य असेल तर कधी बाधक बनणार नाही. तर जे-जे आले आहेत, साधना करीत आहेत, ते खूप समजतही आहेत. म्हणून एकदा पुन्हा प्रेरणा देतो की आपल्या स्वतःला सुधारण्याचे काम हे पहिले काम. आपल्या स्वतःला सुधारून दुसऱ्यांना कसा लाभ देता येईल. जो आपलाच लाभ प्राप्त करू शकला नाही, तो दुसऱ्यांचा काय लाभ करेल? एकच लक्ष असावे की मला आपल्या स्वतःला सुधारावयाचे आहे. आपल्या स्वतःला सुधारल्याविना मी लोकांना धर्माकडे आकर्षित करू शकत नाही. माझे सद्‌गुण पाहूनच लोक आकर्षित होऊन आले आहेत आणि भविष्यातही येत रहातील.

लोक कल्याण करावयाचे आहे तर पहिले स्वतःकडे पाहावे की माझ्यात अहंभाव तर नाही. माझ्यात काही प्राप्त करण्याचा भाव तर नाही. धर्मात प्राप्त करणे नसते, केवळ देणे असते. मी काय देऊ शकतो, मी काय देऊ शकते. आपले आदर्श जीवन जगून लोकांना आकर्षित करणे, हीच सगळ्यात मोठी देण आहे. लाखो रूपयांचे दान ह्यासमोर काहीही नाही. एक मनुष्य इतका बदलला, इतका बदलला. त्याला पाहून लोकांच्या मनात प्रेरणा जागते की अरे! हा किती बदलला! मी ही असाच बदलीन.

माझे जे धर्मपुत्र आहेत, धर्मपुत्री आहेत, हा एक धर्म-परिवार आहे. हा खूप वाढो, खूप पसरो. जसे मोठ्या परिवाराच्या प्रमुखाच्या

मनात आनंद होतो, तसाच आनंद आमालाही होतो. होऊ शकते ह्या धम्म-परिवारात काही असेही लोक असतील जे धर्माला योग्य प्रकारे समजू शकले नाहीत. जे ह्या अहंकारात काम करीत आहेत की मला काय प्राप्त होईल? मला काय मिळेल? माझे प्रभुत्व राहील की नाही?

असे निरुपयोगी लोक थोडेसेच असतात. बहुसंख्य तर आपल्या स्वतःला सुधारण्यासाठीच येतात आणि सुधारतात. ह्यामुळेच हा परिवार चालत आहे. म्हणून पुन्हा एकदा सर्वांना प्रेरणा देतो की आपल्या आत पाहा आणि आपल्यात जो काही दोष आहे, त्याला काढा. आपोआप दोष निघेल कारण दोष काढण्याची साधना मिळाली आहे ना! आत जो मळ असेल तो टिकणारच नाही. जसे-जसे साधनेत पुष्ट होत जाल, तसतसा मळ आपोआप बाहेर निघेल. ह्या संवेदनेने निघेल अथवा त्या संवेदनेने निघेल, परंतु समता राहिली तर निघेलच.

बस. एकच लक्ष्य– मला स्वतःला सुधारावयाचे आहे. मी जसाही आहे, जशाही आहे– ह्यापेक्षा अधिक चांगला बनू, अजून चांगली बनू. बस, माझे काम झाले. असे होईल तेव्हाच ह्या केंद्राच्या उद्घाटनाची सफलता होईल. जगात अजूनही केंद्र बनत आहेत. सर्व असेच होवोत. कसे अधिकात अधिक लोकांचे कल्याण होईल! अधिकाअधिक लोकांना धर्म मिळेल! कोणत्याही संप्रदायात बांधले जायचे नाही. धर्माचे संप्रदायाशी काहीही घेणे-देणे नाही. कोणत्याही संप्रदायाचा असो, कोणत्याही जातीचा, वर्णाचा, गोत्राचा असो. मनुष्य आहे ना. बस पर्याप्त आहे. मनुष्य आहे तर ह्या रस्त्यावर चालून आपले कल्याण करून घेईल. त्याला आपले नाव बदलण्याची गरज नाही. त्याला आपली जात बदलण्याची गरज नाही. त्याचा जो संप्रदाय आहे, त्याला बदलण्याची गरज नाही. आपले मनुष्यत्व जागवावयाचे आहे. एक चांगला मानव कसा असला पाहिजे. बस हेच लक्ष्य ठेऊन काम कराल! एखाद्याला राजकारणात रूची असेल तर असो. परंतु ही विद्या राजकारणाच्या पलिकडची आहे. ह्यात कोणत्याही राजकारणाचे प्रभुत्व असता कामा नये.

वरील सिद्धांतांनुसार काम करीत राहाल तर सफलता मिळेलच, स्वतःला सुधारण्यासाठीच ही विद्या आहे. सर्व धर्मपुत्र-धर्मपुत्रींनो! शुद्ध धर्मात खूप परिपक्व व्हा! मिळून-मिसळून आपले उत्तरदायित्व पूर्ण करा! तुमचे मंगल होवो! तुमच्या सोबतच अनेकांचे मंगल होवो! हेच माझे मंगल आशिष आहेत. खूप मंगल हो! खूप कल्याण होवो!!

कल्याणमित्र
सत्यनारायण गोयन्का

---

## धम्मपुष्कर, अजमेरमध्ये पगोडा-निर्माण

राजस्थानचे प्राचीन नगर पुष्करमध्ये स्थित धम्म पुष्कर येथे २९ शून्यागार असणाऱ्या पगोडा-निर्माणाची योजना बनविण्यात आलेली आहे. ह्यामुळे निश्चितच येथे गंभीर तपस्या करणाऱ्यांना विपुल धर्मलाभ प्राप्त होईल. ह्या महान पुण्यवर्धक कार्यात भाग घेण्यासाठी इच्छुक साधक-साधिका खालीलप्रकारे संपर्क करू शकतात. श्री रवी तोषणीवाल - ०९८२९०७१७७८ व श्री अनिल धारीवाल - ०९८२९०-२८२७५. ईमेल - **corporate@toshcon.com:** बैंक अकाउंट विपस्सना केंद्र पुष्कर, इंडियन बैंक, जयपुर रोड, अजमेर- **SB A/C No.: 517444214, IFS Code: IDIB000A006, MIR Code:305019001.**

## धम्म अजन्ता, औरंगाबादचे नवनिर्माण

विपश्यना केंद्र धम्म अजन्तासाठी १५ एकर नवीन जमीन खरेदी करून जवळपास ८० साधकांसाठी निर्माणकार्य आरंभ झाले आहे. एक धम्मकक्ष बनलेला आहे ज्यात प्रत्येक रविवारी सामूहिक साधना होते. रस्ते, पाणी व वीज उपलब्ध झाली आहे. जे साधक-साधिका ह्या पुण्यकार्यात भागीदार होऊ इच्छित असतील ते खालील पत्त्यावर संपर्क करू शकतात.

**अजन्ता अन्तर्राष्ट्रीय विपश्यना समिति,** 'राजहंस' २ सुराणा नगर, जालना रोड, औरंगाबाद-४३१००३. मोबाईल: ९४२२२-११३४४.

---

## ग्लोबल पगोडात पालि अभ्यासक्रम - २०१३

**विपश्यना विशोधन विन्यास, ग्लोबल पगोडात अनिवासीय अभ्यासक्रम पालि व्याकरण, सुत्त, सैद्धांतिक विपश्यना इत्यादी. शिक्षणाचे माध्यम -** पालि-इंग्रजी, पालि-मराठी, पालि-हिंदी, **अवधी** ०१-०२-२०१३ ते ३०-९-२०१३ पर्यंत (८ महिने, आठवड्यात एकदा, ११ ते ५ वाजेपर्यंत); **आवेदन पत्र प्राप्त करण्याचे स्थान व तिथी -** वी. आर. आय., ग्लोबल पगोडा, १ ते १५ जानेवारी २०१३ पर्यंत; आवेदन पत्र जमा करण्याची अंतिम तारीख - २०-१-२०१३

### निवासीय अभ्यासक्रम (परियत्ती आणि पटिपत्ती): –

**३० दिवसीय प्रारंभिक पालि-मराठीः अवधि -** ०१-०१-२०१३ ते ३१-०१-२०१३ पर्यंत; **फार्म जमा करण्याची अंतिम तिथि -** ०१-१२-२०१२;

**३० दिवसीय उच्चत्तर पालि-हिंदी** (वी.आर.आय. इगतपुरीतून प्रारंभिक पालि-हिंदी अभ्यासक्रम **केलेल्या विद्यार्थ्यांसाठी) अवधी -** ०१-०५-२०१३ ते३१-५-२०१३ पर्यंत **आवेदन पत्र जमा करण्याची अंतिम तारीख -** ०१-०४-२०१३;

**९० दिवसीय अभ्यासक्रम; पालि-इंग्रजी; अवधी -** ०१-०७-२०१३ ते ३०-०९-२०१३ पर्यंत; आवेदन पत्र जमा करण्याची अंतिम तारीख - १५-०५-२०१३; **सर्वांसाठी कंप्यूटर वर आवेदन पत्र –** www.vridhamma.org ने ही पाठवू शकतात. **संपर्कः** विपश्यना विशोधन विन्यास (V. R. I.), ग्लोबल विपश्यना पगोडा, एस्सेल वल्डच्या जवळ, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०००९१.

**अधिक माहितीसाठी संपर्क करा –** डॉ शारदा संघवी – फोनः (०२२-२३०९५४१३) ०९२२३४६२८०५,

**ईमेलः s_sanghvi@hotmail.com;** २) श्रीमती बलजीत लाम्बा : फोनः ०९८३३५१८९७९; ३) अलका वेंगुर्लेकरः मोबाईल – ०९८२०५८३४४०.

---

## ग्लोबल विपश्यना पगोडासाठी कॉर्पस फंड

ग्लोबल पगोडाच्या निर्बाध संचालनासाठी एक कॉर्पस फंड एकत्र केला जात आहे, ज्यामुळे भविष्यात ह्याचा सांभाळ कोणत्याही बाहेरील दबावाविना सफलतापूर्वक होत राहील आणि म्यंमामध्ये सद्धर्माला सुरक्षित ठेवणे तसेच भारतात परत पाठविणे याबद्दल सयाजी ऊ बा खिन व म्यंमाच्या प्रती कृतज्ञता ज्ञापनाचे हे अद्भुत पावन प्रतीक हजारो वर्षांपर्यंत कायम राहील. ह्या कॉर्पस फंडाचा उपयोग कोणतीही व्यक्ती आपल्या व्यक्तिगत लाभासाठी करू शकत नाही, तर सरकारी बँकेत जमा ह्या धनाच्या व्याजाने पगोडाचा दैनिक खर्च व सांभाळासंबंधी कामे पगोडा-संरक्षणाच्या नियमानुसार होत राहतील.

**कार्पस फंड दान पाठविण्यासाठी विवरण ह्या प्रकारे आहे –**

१. भारतात कोर बँकिंगव्दारे ग्लोबल विपश्यना फाउंडेशनला दान पाठविण्यासाठी भारताच्या कोणत्याही बँक ऑफ इंडियाच्या शाखेतून पैसे पाठवू शकतात. विवरण खालील प्रमाणे आहे–

**"Global Vipassana Foundation"**
**'Axis Bank India'**, A/C. NO: 911010032397802
SWIFT CODE: AXISINBB062,
IFSC CODE: UTIB0000062
MICR CODE: 400211011,
BRANCH: Malad west branch, Mumbai-400064.

२. भारताच्या बाहेरून दान पाठविण्यांसाठी विवरण खालील प्रमाणे आहे– **(SWIFT transfer to 'Bank of India')**
**"Global Vipassana Foundation"**
Name of the Bank : **"J P Morgan Chase Bank"**
Address : New York, US,
A/c. No. : 0011407376, Swift: CHASUS33.

## चेक/ड्राफ्ट कृपया खालील पत्त्यावर पाठवावेत –

ग्लोबल विपश्यना फाउंडेशन रजि. ऑफिस-ग्रीन हाउस, २ रा माळा, ग्रीन स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-४०००२३, फोन: ०२२-२२६६५९२६.

## आसाममध्ये नव्या विपश्यना केंद्राचे निर्माण

आसामाची राजधानी गौहाटीपासून २५ कि.मी. दूर सुंदर आणि स्वस्थ वातावरणात जवळपास चौतीस हजार वर्गमीटरचे क्षेत्र विपश्यना साधना केंद्रासाठी तीस लाख रूपयात विकत घेतले गेले आहे. पूज्य गुरुदेवांनी स्वीकार करीत ह्याला "धम्म आसाम" नाव दिले आहे. जमिनीवर निर्माण कार्य आरंभ झाले आहे. जे साधक-साधिका ह्या पुण्यवर्धक कार्यात भागिदार होऊ इच्छित असतील ते खालील पत्त्यावर संपर्क करू शकतात.

Name: **Assam Vipassana Trust:** Bank: **State Bank of India** Branch: **New Guwahati**, Account no: 32575422691, IFSC: SBIN0000221, SMS on M0. 09435553065 or Email: dhammaasama@gmail.com

## नवे उत्तरदायित्त्व

### वरिष्ठ सहायक आचार्य

1-2. Mr. Andrew & Mrs. Ruth Gordon, New Zealand

### नवनियुक्ती

### सहायक आचार्य

१. श्री केतन शाह, अहमदाबाद
२. श्री प्रेम नारायण शर्मा, नागपूर
३. श्री रुपराव मावंडे, नागपूर
४. श्री शंकर दोराईस्वामी, गोवा
5. Mr. Eric Lataste, France
6-7. Mr. Richard & Mrs. Catherine Galbraith, Spain
8-9. Mr. Charles Lionel Kasturiratne & Mrs. Indrani Tennakoon, Sri Lanka

## सयाजी ऊ बा खिनांच्या पुण्यतिथीनिमित्त

### पूज्य गुरुदेवांच्या सान्निध्यात एक दिवसीय महाशिबिर

२० जानेवारी, २०१३, रविवार, वेळः सकाळी ११ वाजेपासून दुपारी ४ वाजेपर्यंत, 'ग्लोबल विपश्यना पगोडा' च्या मोठ्या धम्मकक्षा (डोम) मध्ये. कृपया लक्ष द्यावे की ह्या विशाल शिबिरात आपल्याला कोणत्याही प्रकारची असुविधा होऊ नये यासाठी बुकिंग केल्याविना येऊ नये. बुकिंग संपर्कः मो. ०९८९२८५५६९२, ०९८९२८५५९४५ फोन नं.: ०२२-२८४५११७०, ३३७४७५४३, ३३७४७५४४, (फोन बुकिंगः सकाळी ११ ते सायं ५ पर्यंत, रोज)

**ईमेल Registration:** oneday@globalpagoda.org;
**Online Registration:** www.vridhamma.org

## दीपावली व नववर्षाभिनंदन

दर वर्षीप्रमाणे अनेक साधकांतर्फे दीपावली व नव वर्षाच्या अभिनंदनाचे पत्र मिळाले. प्रत्येकाला नव वर्षाच्या मंगल कामना प्रेषित करण्यासाठी अवधी मिळाला नाही, म्हणून 'विपश्यना' पत्रिकेच्या माध्यमाने त्यांना व अन्य सर्व साधक-साधिकांना माझी असीम मंगल मैत्री मिळो! नवीन वर्ष सर्वांच्या मनात धर्माची नवज्योत प्रज्वलित करो! दिवसेंदिवस प्रज्ञा पुष्टतर होत जाओ! धर्म धारण करण्याचे मंगलकारी फळ प्रभूत हो! प्रभावशाली हो! सर्वांचे मंगल होवो!

मंगलमित्र
सत्यनारायण गोयन्का

## दोहे धर्माचे

**काया वाचा मनाचे, करू नको कर्म अशुद्ध।**
**दुष्कर्माचे फळ पिके, होय सुगती निरुद्ध॥**

**आपल्या आपल्या कर्माने, सद्गती दुर्गती पावे।**
**कोण कोणाला तारतो भले, न मिथ्या भ्रमी राहावे॥**

**आपल्या आपल्या कर्माचे, आम्हीच आधार।**
**आपल्या सुख दुःखाला, आम्हीच जबाबदार।**

**जसे तुझे आचरण, फळ तसेच मिळे जनी।**
**दुराचरणी दुःखच वाढे, सुखी सदाचरणी॥**

## दोहे धर्माचे

**आपापल्या कर्माने, आपणच निर्मळ होत राही।**
**स्वतःला निर्मळ करणारा, दुसरा कोणी नाही॥**

**स्वतःच मलिन करे, स्वतःच अशुद्ध होय।**
**दुराचरण सोडता, स्वतःच शुद्ध होय॥**

**सुख दुःख स्व कर्माने, कोण दुजा आधार।**
**सुख इच्छितो मानवा, तर स्व कर्म सुधार॥**

**जगी अंधकारच करे, राहू ग्रासित रजनीस।**
**सुटे पापाचा काळिमा, जगत झुकवीते शीष॥**

**कसा भोळा बावळट, आपलाच वैरी आप।**
**आपलेच अहित करे, करे पापांवर पाप॥**

**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - ४२२ ४०३
जिल्हा- नाशिक, महाराष्ट्र, भारत
**फोन :** (०२५५३) २४४०७६, २४४०८६, २४३७१२, २४३२३८. **फैक्स :** (०२५५३) २४४१७६
**Email:** info@giri.dhamma.org
**Website:** www.vridhamma.org